# Maharashtra Board Class 10 Sanskrit Amod Notes Chapter 13 चित्रकाव्यम्

## चित्रकाव्यम् Summary in Marathi

प्रस्तावना :

संस्कृत भाषा विविध वैशिष्ट्यपूर्ण सुभाषितांनी अलंकृत झाली आहे. "चित्रकाव्यम्' हे यातीलच एक. 'बुद्धिविकासकानि सुभाषितानि नाम चित्रकाव्यानि' याचा अर्थ बुद्धीचा विकास करणारी सुभाषिते म्हणजे चित्रकाव्ये. काही विशिष्ट वृत्तांच्या बांधणीने व नावीन्यपूर्ण काव्यात्मक रचनेद्वारा चमत्कृतीकाव्य तयार करणे हा चित्रकाव्यांचा हेतू आहे. यातून मनोरंजन व आनंदही प्राप्त होतो.

चित्रकाव्यम् हे 'काल्पनिक काव्य' आहे. असे काव्य कवीची अफाट बुद्धिमत्ता व त्यांचे भाषेवरील प्रभुत्व दर्शविते. प्रस्तुत 'चित्रकाव्यम्' काव्यामध्ये, अन्तरालाप, अन्योक्ति, हास्योक्ति, कर्तृगुप्ता प्रहेलिका, समस्यापूर्ति, वाकोवाक्यम् इ. काव्याच्या विविध प्रकारांचा अंतर्भाव झाला आहे.

श्लोकः 1

के संजघान कृष्ण का शीतलवाहिनी गङ्गा।
के दारपोषणरता: कं बलवन्तं न बाधते शीतम्।।1।। (अन्तरालाप:)

अनुवादः

कृष्णाने कोणाला मारले? (कंस), शीतल वाहणारी गंगा कोणती आहे? (काशीक्षेत्रात वाहणारी). बायकोचे पोषण करण्यात कोण मग्न असतात? (केदारपोषणरत) कोणत्या बलवानाला थंडी बाधत नाही ? (कंबलवंत-कांबळे धारण करणाऱ्याला) स्पष्टीकरण – हे अन्तरालापाचे उदाहरण आहे.

येथे श्लोकात विचारलेल्या चार प्रश्नांची उत्तरेही तिथेच दडली आहेत. शब्दालंकारावर आधारित असा हा श्लोक आहे. काही अक्षरांना जोडल्यास अथवा विभाजित केल्यास विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात, ज्याप्रमाणे

1. के संजघान' कृष्ण म्हणजे, कृष्णाने कोणाला ठार मारले? येथे, प्रथम चरणातील पहिली दोन अक्षरे जोडल्यास 'कंस' असे योग्य उत्तर मिळते. 2. 'का शीतलवाहिनी गंगा?' शीतल वाहणारी गंगा नदी कोणती? दुसऱ्या चरणातील पहिली दोन अक्षरे जोडल्यास काशी म्हणजे काशीक्षेत्र असे उत्तर मिळते. याचा अर्थ, काशी क्षेत्रात वाहणारी गंगा शीतल आहे.

3. बायकोचे पोषण करण्यात कोण मग्न असतात? तिसऱ्या चरणातील पहिली दोन अक्षरे जोडल्यास केदार (शेत) असे उत्तर मिळते. येथे केदारपोषणरत याचा अर्थ शेतकरी असा होतो. 4. कोणत्या बलवानास थंडी बाधत नाही? येथेही, चौथ्या चरणातील तीन अक्षरे जोडल्यास कम्बलवन्त असा शब्द म्हणजेच उत्तर मिळते, त्याचा अर्थ, कांबळे धारण करणाऱ्या बलवानास थंडी वाजत नाही.

श्लोक: 2

रे रे चातक सावधानमनसा मित्र क्षणं श्रूयताम्
अम्भोदा बहवोऽपि सन्ति गगने सर्वेऽपि नैतादृशाः।
केचिद् वृष्टिभिरार्द्रयन्ति वसुधां गर्जन्ति केचिद् वृथा .
यं यं पश्यसि तस्य तस्य पुरतो मा ब्रूहि दीनं वचः।।2।। (अन्योक्तिः ) (वृत्तम् – शार्दूलविक्रीडितम्)

अनुवादः

रे रे चातक मित्रा, क्षणभर लक्ष देऊन (सावधानपूर्वक) ऐक, आकाशात असंख्य (पुष्कळ) ढग असतात (परंतु) सगळेच सारखे नसतात. काही ढग पावसाच्या वर्षावांनी पृथ्वी जलमय करतात, तर काही व्यर्थ (विना कारण) गर्जना करतात. (म्हणून) तुला जो जो ढग दिसेल त्याच्यापुढे दीनवाणीने बोलू नकोस.

स्पष्टीकरण – हे 'अन्योक्ती' – 'दुसऱ्याला उद्देशून बोलणे' या काव्यप्रकारचे उदाहरण आहे. येथे, चातक पक्षी वर्षाकाळाचा अग्रदूत (सूचक) मानला आहे व तो पावसाचे पाणी पिऊन तहान भागवतो असे समजतात. येथे दोन प्रकाराच्या ढगांच्या गुणवैशिष्ट्यांना दर्शवत कवीने त्यांच्यातील फरक स्पष्ट केला आहे. काही ढग केवळ गर्जना करतात, तर काही खरोखरच पाणी देतात.

कवी चातकास केवळ गर्जना करणाऱ्या ढगांकडे पाणी न मागण्याचा सल्ला देतो. कवीला दीनजनांना उद्देशून सांगायचे आहे की सर्वच धनी माणसे उदार नसतात. चातकाला उद्देशून दीन लोकांना सल्ला देणारी ही अन्योक्ती आहे.

श्लोकः 3

वैद्यराज नमस्तुभ्यं यमराजसहोदर।
यमस्तु हरति प्राणान् त्वं तु प्राणान् धनानि च ।।3।। (हास्योक्तिः ) (वृत्तम् – अनुष्टुप्)

अनुवादः

हे वैद्यराजा, यमराजाच्या सख्ख्या भावा, तुला नमस्कार असो! यम (केवळ) प्राणच हरतो, पण तू प्राण व धनही दोन्ही हरतोस. स्पष्टीकरण – हा श्लोक हास्योक्तीचे उदाहरण असून, येथे अपरिपक्व आणि लोभी वैद्याची निंदा विनोदी पद्धतीने केली आहे.

श्लोकः 4

राक्षसेभ्य: सुतां हत्वा जनकस्य पुरीं ययौ।
अत्र कर्तृपदं गुप्तं यो जानाति स पण्डितः।।4।। (कर्तृगुप्ता प्रहेलिका) (वृत्तम् – अनुष्टुप)

अनुवादः

(कोणी एक जण) राक्षसांकडून कन्येचे हरण करून जनकाच्या नगरीस गेला किंवा (कोणी एक जण ) जनकाच्या मुलीचे हरण करून नगरीस गेला. येथे कर्ता गुप्त आहे. जो जाणतो तो खरा विद्वान.

स्पष्टीकरण – वरील श्लोक हा चित्रकाव्याचा वेगळा प्रकार आहे. ही कर्तृगुप्त- प्रहेलिका आहे. येथे 'राक्षसेभ्यः' या शब्दात कर्ता गुप्त आहे. या शब्दाचे दोन भाग केले असता, राक्षस व इभ्यः असे दोन शब्द मिळतात.

https://www.evidyarthi.in/

'इभ्यः' चा अर्थ राजा असा होतो. याचाच अर्थ राक्षसांचा राजा. राक्षसानाम् इभ्यः म्हणजे रावण. या रीतीने, एक अर्थपूर्ण वाक्य तयार होते. राक्षसांचा राजा रावण जनकाच्या कन्येचे हरण करून नगरीस गेला.

श्लोक: 5

अयं न भक्तो न च पूजको वा
घण्टां स्वयं नादयते तथापि।
धनं जनेभ्यः किल याचतेऽयं
न याचको वा न च निर्धनो वा।।5।। (प्रहेलिका) (वृत्तम् – उपजातिः)

अनुवादः

हा भक्त नाही व पूजकहीं नाही तरीही स्वतःहून घंटा वाजवितो. खरोखर याचक व धनहीन नसतानाही. हा लोकांकडून पैसे घेतो. (तर मग सांगा कोण बरे आहे हा?)

स्पष्टीकरण – श्री सदाशिव त्र्यंबक रहातेकर लिखित हा श्लोक काव्यप्रवाह या काव्यसंग्रहातून घेण्यात आला आहे. हे अपहनुति अलंकाराचे उदाहरण आहे. या श्लोकाचे उत्तर 'कःहवानयाकलो' असे आहे. उलट दिशेने वाचले असता आपल्याला योग्य उत्तर मिळते ते असे, लोकयानवाहकः- याचा अर्थ बस-कंडक्टर अथवा बस-वाहक,

श्लोकः 6

रामाभिषेके जलमाहरन्त्या हस्तात् मृतो हेमघटो युवत्याः।
सोपानमार्गेण करोति शब्दं ठंठं ठठं ठं ठठठं ठठं ठः।।6।। (समस्यापूर्तिः) (वृत्तम् – इन्द्रवज्रा)

अनुवादः

रामाच्या राज्याभिषेकासमयी युवतीच्या हतातून पाण्याने भरलेला सोन्याचा घडा निसटला, तो जिन्यावरुन आवाज करत गेला. ठंठ ठठं ठं ठठठं ठठं ठः.

श्लोक : 7

भिक्षुः क्वास्ति बलेर्मखे पशुपतिः किं नास्त्यसौ गोकुले
मुग्धे पन्नगभूषणः सखि सदा शेते च तस्योपरि।
आर्ये मुञ्च विषादमाशु कमले नाहं प्रकृत्या चला
चेत्थं वै गिरिजासमुद्रसुतयोः सम्भाषणं पातु वः।।7।। (वाकोवाक्यम्) (वृत्तम् – शार्दूलविक्रीडितम्)

अनुवादः

(लक्ष्मी विचारते) तो भिक्षुक कोठे आहे ? (पार्वती उत्तर देते) बळीच्या यज्ञात. पशूपती कोठे आहेत? ते गोकुळात नाहीत का? प्रिये, ज्याचा अलंकारच साप आहे तो कोठे आहे? सखि, तो त्यावरच नेहमी निद्रासुख घेतो.

आर्ये, दुःख (विष खाणाऱ्याला) सोडून दे. अगं लक्ष्मी, मी तुझ्यासारखी चंचल नाही. अशा रितीने पार्वती (पर्वताची कन्या) व लक्ष्मी (समुद्राची कन्या) यातील हे संभाषण आपले रक्षण करो.

(वरील संवादात, लक्ष्मी पार्वतीला विचित्र विशेषणांचा प्रयोग करून शंकराबद्दल विचारते. याला चोख प्रत्युतर देण्याच्या हेतूने, पार्वती देखील तीच विशेषणे विष्णूकरिता वापरून तिचे चातुर्य दर्शविते.)

शब्दार्थाः

1. संजधान – had killed – मारले
2. कंसं जघान – had killed – कंसाला मारले
3. शीतलवाहिनी – cool flowing – थंड वाहणारी
4. दारपोषणरताः – engrossed in – बायकोचे पोषण
5. nurturing wife – करण्यात मग्न
6. केदार – field – शेत
7. कं बलवन्तम् – to which strong man – कोणत्या बलवान माणसाला
8. न बाधते – does not affect – बाधत नाही
9. कंबलवन्तम् – one who has a blanket – ज्याच्याकडे कांबळे आहे त्याला
10. चातक – a bird named चातक – चातक पक्षी
11. सावधानमनसा – with attentive mind – सावधानपूर्वक
12. श्रूयताम् – may listen – कृपया ऐकावे
13. अम्भोदा: – clouds – ढग
14. वृष्टिभिः – by rain shower – पावसाच्या वर्षावाने
15. आर्द्रयन्ति – humidify – जलमय करतात
16. वृथा गन्ति – roar in vain – व्यर्थ गर्जना करतात
17. तस्य पुरतः – in front of him – त्याच्या समोर
18. मा ब्रूहि – do not speak – बोलू नकोस
19. दीनं वचः – pitiable words – दीनवाणी
20. यमराजसहोदर – Othe real brother of यमराज – यमराजाच्या हे सख्ख्या भावा
21. वैद्यराज – O great doctor – वैद्यराज
22. सुता – daughter – कन्या
23. पूरी – city – नगरी
24. ययो – had gone – गेला
25. स्वयं नादयते – makes sound on its own – स्वतःहून वाजवते
26. किल – indeed – खरोखर
27. याचकः – beggar – याचक
28. निर्धनः – poor – धनहीन
29. रामाभिषेके – at the time of – रामाच्या
30. राम's coronation – राज्याभिषेकासमयी
31. आहरन्त्या – taking – घेऊन जाणाऱ्या
32. सूतः – escaped/skipped – निसटलेला
33. हेमघट: – golden pot – सोन्याचा घडा
34. युवत्याः – from a young lady – तरुणीकडून
35. सोपानमार्गेण – from stairs – जिन्यावरून
36. क्व – where – कुठे

https://www.evidyarthi.in/

37. बलेमखे – in the sacrifice of बली – बळीच्या यज्ञात
38. पशुपतिः – lord of animals – शंकर
39. पनगभूषण: – whose ornament – ज्याचा अलंकार
40. is a snake – सर्प आहे तो
41. शेते – sleeps – झोपलेला आहे
42. मुञ्च विषादम् – leave the disappointment – दु:ख सोडून दे
43. कमले – o goddess Laxmi – लक्ष्मी
44. गिरिजा – Goddess Parvati – पार्वती
45. समुद्रसुता – daughter of an ocean – समुद्राची कन्या
46. पातु वः – may protect us – आपले संरक्षण करो